बीड । बुधवार
३०.०४.२०२५
वर्षे : ५ अंक : ३०
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१




# 'पाकिस्तानातून आलेल्या या लोकांनी भारत सोडू नये'

## मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा!

**मुंबई । प्रतिनिधी**

पाकिस्तानातून भारतात आलेल्या सिंधी हिंदूंना देश सोडावा लागणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी मांडली.

दीर्घ मुदतीच्या व्हिसावर भारतात वास्तव्यास असलेल्या सिंधी हिंदू लोकांना घाबरण्याचे कारण नाही, असं त्यांनी सांगितलं. फडणवीस म्हणाले की, 'जे नागरिक भारतात दीर्घकाळापासून वास्तव्यास आहेत, त्यांना कुठेही जाण्याची गरज नाही. फक्त काही विशिष्ट प्रकरणांमध्ये, जिथे नियमभंग झाला आहे, तिथेच कारवाई होईल.' यासंदर्भात



बोलताना फडणवीस यांनी स्पष्ट केले की केंद्र सरकारच्या निर्देशानुसार, अशा नागरिकांवरच कारवाई होते जे दीर्घ मुदतीच्या व्हिसाचा गैरवापर करतात. सिंधी समाजातील लोक भारतात शांततेने राहत असून, त्यांच्या सुरक्षेबाबत सरकारने ठाम भूमिका घेतली आहे. त्यांना देश सोडावा लागेल, अशी कोणतीही परिस्थिती निर्माण झालेली नाही. उलट, अशा नागरिकांना भारतातच राहण्यासाठी अधिकृत प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर योग्य ती मदत केली जाईल, असंही ते म्हणाले. केंद्र सरकारने पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानातील अल्पसंख्यांक नागरिकांना दीर्घ मुदतीचा व्हिसा दिला आहे. यामध्ये हिंदू, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन आणि पारशी या धर्मीयांचा समावेश आहे. विशेषतः महिलांवर होणाऱ्या अत्याचारामुळे भारतात स्थलांतरित होणाऱ्यांना ही सवलत दिली जाते. भारतात आलेल्या या नागरिकांना केंद्र शासनाकडून नागरिकत्व कायद्यानुसार संरक्षण दिलं जातं. त्यामुळे अनेक वर्षांपासून राहणाऱ्या नागरिकांना कोणतीही भीती बाळगण्याची गरज नाही, असं प्रशासनाचं मत आहे. मुंबईसह महाराष्ट्रात २९ जिल्ह्यांमध्ये पाकिस्तानातून स्थलांतरित झालेले २१ हजारांहून अधिक नागरिक स्थायिक झाले आहेत. त्यापैकी बहुतांश जण सिंधी समाजाचे आहेत. अनेकांनी व्यवसाय, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात आपलं योगदान दिलं आहे. त्यांना हटवण्याची प्रक्रिया सुरु असल्याच्या अफवांवर फडणवीस यांनी पूर्णविराम दिला आहे. त्यांनी स्पष्ट सांगितले की, सरकार अशा नागरिकांच्या पाठिशी उभं आहे आणि त्यांच्या विरोधात कुठलीही अन्यायकारक कारवाई होणार नाही.



*वैशाख महिन्यामध्ये उन्हाचा पारा ४५ अंश वाढला असला तरी पिंपळनेर परिसरात हे मनमोहक पळसाचे झाडं वाट सरूनचे लक्ष वेधून घेत आहे.( छाया आराध्या नरनाळे.)*

## भर रस्त्यावर ट्रक पेटला



**परळी । प्रतिनिधी**


परळी वैजनाथ शहरातील बीड व परभणीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) या ठिकाणी भर उन्हात, भरस्त्यावर दुपारी ४.३० च्या सुमारास उभ्या ट्रकला आग लागून हा ट्रक पेटला. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी या घटनेने जवळपास पाऊण तास पेटलेल्या ट्रकचा थरार बघायला मिळाला.

▶▶ उर्वरित पान २ वर

## कर्जाचा डोंगराला कंटाळून शेतकऱ्याची गळफास घेत आत्महत्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यात एका शेतकऱ्याने कर्जबाजारी पणाला कंटाळून आत्महत्या केली आहे. गेल्या काही दिवसांपासून शेतकरी आर्थिक अडचण आणि मानसिक तणावाचा सामना करत होते. त्यांनी शेतातील झाडाला गळफास लावून आत्महत्या केली आहे. या दुर्दैवी मृत्यूनंतर परिसरातून शोक व्यक्त केला जात आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव विठ्ठल साखरे असे आहे. त्यांनी वयाच्या ४० व्या वर्षी स्वत:ला संपवलं. विठ्ठल माजलगाव तालुक्यातील शहाजनपूर येथील



रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून विठ्ठल आर्थिक अडचणींचा सामना करत होते. तसेच उदरनिर्वाहासाठी पुरसे पैसेही नव्हते. शिवाय विठ्ठल यांच्या डोक्यावर कर्जाचं डोंगर देखील होतं. त्यामुळे ते अनेक दिवसांपासून मानसिक तणावात होते. याच त्रासाला कंटाळून त्यांनी सोमवारी रात्री आपल्या शेतात जाऊन एका झाडाला गळफास घेतला. मंगळवारी (२९ एप्रिल) सकाळी ही घटना उघडकीस आली. त्यांचा मृतदेह झाडाला लटकलेला पाहुन कुटुंबाला धक्काच बसला. यानंतर गावकऱ्यांनी तातडीने पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

## लोकाभिमूख व गतिमान अभियान राबवावे

### १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा बैठकीत जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

१०० दिवसाच्या कार्यक्रमात जिल्हयातील प्रत्येक अधिका-यांनी नाविण्यपूर्ण,लोकाभिमूख, गतीमान अभियान राबवून स्वच्छता ठेवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेचा दुस-या टप्यातील कार्यालयाचा मुल्यामापन अहवाल आढावा व्ही.सी व्दारे घेण्यात आला. या प्रसंगी त्यांनी हे आवाहन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,आदित्य




जिवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेस सुर्यवंशी तसेच विविध कार्यालयाचे कार्यालय प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, बीड जिल्हयामध्ये कार्यालयीन स्वच्छतेचा अभाव आढळून आला असून कार्यालयीन स्वच्छता हा पाया असून स्वच्छतेला प्रथम प्राधान्य द्यावे तसेच ही स्वच्छता केवळ अभियानापुरतीच मर्यादित न ठेवता

▶▶ उर्वरित पान २ वर

## कॅबिनेटमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांसह माजी मंत्र्यांवरही गुन्हा दाखल




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अडचणी वाढल्या असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के यांच्यासह ५४ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. साखर कारखाना कर्जमाफी प्रकरणात ९ कोटींच्या अपहार प्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. शेतकऱ्यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना वितरित न केल्याचा आरोप मंत्री महोदयांवर ठेवण्यात आला आहे. सन २००४ -२००५ आणि २००७ साली अपहार केल्याचे दाखल फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. कारखान्याच्या तत्कालीन संचालक मंडळावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी प्रवरा कारखान्याचे सभासद बाळासाहेब केरूनाथ विखे यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अखेर, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर विखे पाटलांसह पाटलांसह ५४ जणांवर भादंस कलम ४१५,४२०,४६४, ४६५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबानगरीत श्री गजानन विजय ग्रंथाचा सामुदायीक पारायण सोहळ्याचे अयोजन

**● काल्याचे कर्तन, दिपोत्सव व महाप्रसादाने होणार सांगता**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे अयोजन ७ मे ते १० मे दरम्यान सकाळी ७ ते१० या वेळेत शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आहे.त्याची सांगता शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर पालखी उत्सव,महाआरती,महाप्रसाद 'सत्संग श्री गजाननाचा' व श्रींची दिपोत्सवात शेजारती



होऊन कार्यकमाची सांगता करण्यात येणार आहे. या पारायाण सोहळयास व विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादासाठी अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहान संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हभप. वै. दत्तात्रय जोशी महाराज नळेगावकर यांच्या कृपा अशीर्वादाने गेली १२ वर्षापासून श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे व भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन आयोजन केले जात आहे. प्रति वर्षाप्रमाने याही वर्षी ७ मे ते १०मे २०२५ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आसुन सोहळ्याचे हे १३वे वर्ष आहे.तीन दिवशीय पारायण सोहळा प्रमुख

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये मोबाईल चोर पकडले



**बीड । प्रतिनिधी**

शहरात मोबाईल चोरीचे प्रमाण वाढल्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक नवनित कॉवत यांच्या आदेशवरून स्थाक गुन्या शाखा खडबडून जागी झाली असुन मोबाईल चोरी च्या गुन्हा तील दोन आरोपिना मद्देमालासह अटक केली १० मोबाइल सह दोन लाख ८७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला

फिर्यादी अभिषेक दिनकर केदार वय २० व्य.शिक्षण रा.संतज्ञानेश्वर नगर यांनी पो. स्टे.शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, दि.११ एप्रिल २०२५ रोजी रात्री ०९.१५ वा. सुमारास पिंपरगव्हाण रोड, गायत्री दुकानाच्या जवळ रोडवरुन घरी फोनवर मित्राला बोलत चालत जात असतांना पाठीमागुन काळया रंगाच्या स्प्लेंडर मोटार सायकलवर तिघेजण आले व त्यातील एका अज्ञात इसमाने माझा मोबाईल हिसकावुन घेवुन ते तिघे तेथुन निघुन गेले. वगैरे फिर्याद वरुन

▶▶ उर्वरित पान २ वर

## मुलाने गळफास घेत आत्महत्या केल्याचे कळताच आईने ही विष पिऊन संपवले जीवन

**गेवराई । प्रतिनिधी**

पोटच्या मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती मिळताच दुःख सहन न झाल्याने आईनेही विष पिऊन आपली जीवन यात्रा संपवली. ही घटना गेवराई तालुक्यातील वाहेगाव आमला येथे घडली. अभिमन्यू भागवत खेत्रे वय- ४५ वर्ष व कौशल्या भागवत खेत्रे वय-७० वर्ष रा. वाहेगाव -आमला, ता. गेवराई, जि. बीड असे आत्महत्या



केलेल्या माय लेकराचे नाव आहे.सोमवारी सकाळी अभिमन्यू याने घरातील आडूला गळफास घेऊन आत्महत्या केली.आपल्या मुलाने आत्महत्या करुन जीवन संपविल्याने आई कौशल्या खेत्रे यांना दुःख सहन न झाल्याने त्यांनी देखील विष घेतले. आधीच मुलगा गेला त्यातच आईने विष घेतल्याने कुटुंबीयाने कौशल्या खेत्रे यांना तात्काळ बीडच्या जिल्हा रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले. मात्र, आज सकाळीच आई कौशल्या खेत्रे यांचा उपचार सुरु असताना मृत्यू झाला.या दोन्ही घटना घडल्यानंतर तलवाडा पोलीस घटनास्थळावर दाखल होऊन अभिमन्यू खेत्रे याचा मृतदेह शवविच्छेदन जातेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आला. तर आई कौशल्या खेत्रे यांच्या मृतदेहाचे बीड जिल्हा रुग्णालयात आज शवविच्छेदन करण्यात आले. दरम्यान याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.



# सिंधू जल करार स्थगित करण्याच्या निर्णयावर अण्णा हजारेंची पहिली प्रतिक्रिया



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सगळ्या देशात संतापाच वातावरण आहे. भारतातूनच नाही, परदेशात जिथे कुठे भारतीय वास्तव्याला आहेत, तिथून पाकिस्तान विरुद्ध कारवाई करण्याची मागणी होत आहे. पाकिस्तानला धडा शिकवा, भरपूर झालं, आत्ता यांना सोडायच नाही, अशीच सगळ्या देशाची भावना आहे. आज पहलगाम दहशतवादी हल्ल्याला आठवडा होत आहे. अजूनही देशात वेगवेगळ्या ठिकाणी या दहशतवादी हल्ल्याविरोधात आंदोलन सुरु आहेत. भारत सरकारने सुद्धा एकाही दहशतवाद्याला सोडणार नाही, कल्पनेपलीकडची शिक्षा दिला जाईल हे स्पष्टपणे सांगितलं आहे. पाकिस्तान पुरस्कृत या दहशतवाद्यांनी धर्म विचारुन हल्ला केला. महिलांसमोर त्यांचं कुंकू पुसलं. पुरुष पर्यटकांवर गोळ्या झाडण्याआधी त्यांच्या पॅन्ट कमरेखाली खेचलेल्या होत्या. एकप्रकारे या दहशतवाद्यांनी अत्यंत नीचता दाखवली. त्यामुळे पाकिस्तानच्या नांग्या आता ठेचाच हाच प्रत्येक देशवासियाचा आवाज आहे.

### ● अण्णा हजारे काय म्हणाले ?

पर्यटकांवर हल्ला करणं हा सर्वात मोठा दोष आहे. ते पर्यटक आहेत. ते तुमच्या हिंदुस्तान पाकिस्तान इथून आलेले नाहीत. त्यांचा संबंध नाही. त्यांच्याशी संबंध लावणं बरोबर नाही. सर्वात महत्त्वाच म्हणजे सिंधू नदीच पाणी जर थांबलं, नाक दाबलं तर तोंड उघडतं अशी म्हण आहे. नाक दाबलं तर तोंड आपोआप उघडेल म्हणून ही कृती करण गरजेच आहे असं अण्णा म्हणाले. अण्णा हजारे यांनी सिंधू जल करार स्थगित करण्याच्या निर्णयाच समर्थन केलं.

### ● पाकिस्तानचे धाबे दणाणले

भारत सरकारने पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्याचदिवशी काही निर्णय घेतले. यात पाकिस्तानातून आलेल्या नागरिकांचा व्हिसा तात्काळ रद्द करणं, सिंधू जल कराराला स्थगिती असे काही निर्णय घेतलं. सिंधू जल कराराला स्थगिती देण्याच्या निर्णयामुळे पाकिस्तानचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. त्यांच्याकडून थेट युद्धाची भाषा सुरु झाली आहे.

सर्वसामान्यांपासून सेलिब्रिटी, नेते, समाजसेवक कारवाईची मागणी करत आहेत. बऱ्याच दिवसानंतर टीव्ही कॅमेऱ्यासमोर येऊन समाजसेवक अण्णा हजारे यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर आपलं मत मांडलं. अण्णा हजारे हे माजी सैनिक आहेत. अण्णा हजारे भारतीय लष्करात होते.

# माऊली दादांची समाधी ही संजीवनी आहे बाळासाहेब महाराज गाडे यांचे प्रतिपादन..!

## माऊली दादा म्हणजे ज्ञानेश्वर माऊली आहेत ; विष्णूचा अवतार आहेत

**बीड । प्रतिनिधी**



माऊली दादांना बाळनाथ महाराजांचे दर्शन झाले तेव्हा दादांच्या जीवनातले कोडे सुटले. माऊली दादा म्हणजे ज्ञानेश्वर माऊली आहेत. विष्णूचा अवतार आहेत, चाकरवाडी चे माऊली म्हणजे आळंदीचे माऊली आहे. तप केले की त्याचे फळ प्राप्त होते. ज्या दिवशी आपल्या जीवनात श्री गुरु घडेल त्या दिवशी दारिद्र्य चे दुखः संपते. विसाव्या शतकातील महान संत विभूती वै. ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकर वाडीकर यांच्या कृपा आशीर्वादाने व श्री . ह. भ प तपोनिधी शंतिब्रम्ह महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताहाची तिसऱ्या दिवसाची किर्तन सेवा श्री.ह. भ. प बाळासाहेब महाराज गाडे जाम खेड यांचे सुश्राव्य असे तिसऱ्या दिवसाची किर्तन सेवा संपन्न झाली. महाराजांनी अतिशय चांगल्या प्रकारे अभंग सोडवून भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. महाराजांनी आपल्या वाणीतून भाविकांना संतांची सेवा करून सुखी आनंदी रहा असा संदेश दिला. महाराजांनी त्यांच्या गोड वाणीतून भाविक भक्तांना गोड असा संदेश दिला. गोड अश्या अभंगातून भाविक भक्त किर्तन एकूण भारावून गेले. आणि गोड वाणीतून भाविक भक्तांना मंत्रमुग्ध केले. गायनाचार्य – पिंपळे महाराज , रोडे महाराज, रज्जाक महाराज, हरीभाऊ महाराज काळे , हनुमंत महाराज घोलप, मृदंगाचार्य – अविष्कार महाराज क्षीरसागर, त्रिंबक महाराज शेळके तसेच यावेळी चाकरवाडीचे आदर्श पोलिस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार, बाबासाहेब मोरे, मंचीक पवार ,तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थित होते.



*विधानपरिषद सदस्य आमदार तथा शिवसेनेचे उपनेते मा.सचिनजी अहिर परळी – अंबाजोगाई दौऱ्यावर आले असता त्यांचा स्वागतसत्कार शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केला. यावेळी प्रभु वैजिनाथला अभिषेक करून पुजा करण्यात आली. उपस्थित शिवसैनिकांशी संवाद साधला यावेळीउपजिल्हाप्रमुख नारायण दादा सातपुते, शिवाजीराव कुलकर्णी, भाई संजय महाद्वार डॉ. नयनाताई शिरसाठ, सुशील पिंगळे, रवी वाघमारे, भोजराज पालेवाल, अभिषेक दिवे, राजेश विभुते, सतीश परदेशीं, दिलीप पवार यांचा सह मोठया संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.*

# लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणाऱ्या वटवृक्षाला भिषण आग

## 2 तासानंतर अग्निशामक दलाला आग विझविण्यात यश : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या अडीचशे वर्षांपूर्वीचा ४-५ पिढ्यांचा लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणा-या वटवृक्षाला आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी आग लागली. डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी बीड नगरपरीषदेच्या अग्निशामक दलाशी संपर्क साधुन दुर्दैवी घटनेची कल्पना दिली. अर्ध्यातासात बीड नगर परीषदेचे अग्निशामक दलाचे रमेश आदम ने,अक्षय नखाते आणि वाहन चालक अनिकेत कपाळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. २ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग विझविण्यात यश आले.दरम्यान पाणी संपल्याने लिंबागणेश येथील गावाला टँकर द्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या दादाराव येडे यांनी विनामूल्य आग विझवण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांना कळल्यानंतर वनविभागाचे दोन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील जवळपास अडीचशे वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला सकाळी ९ च्या सुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले.

## जाहीर प्रगटन

### मा.श्रीमती एफ.बी.बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७०५/२०२५**

**संजिवणी व इतर वि. निरंक**

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः (१) संजीवणी भ्र. अनंत शिंदे, वय ५० वर्षे धंदा घरकाम, रा. गुंधा पो. पिपळनेर ता. जि. बीड, २) राहुल पि. अनंत शिंदे वय ३३ धंदा शेती, रा. वरील प्रमाणे ३) मनीज पि.अनंत शिद, वय ३० वर्षे ४) अश्विनी पि.अनंत शिंदे, वय ४५ वर्ष,धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे ५) बसंतबाई भ्र. रामभाऊ शिंदे, वय ७८, रा. वरीलप्रमाणे

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे अनंत रामभाऊ शिंदे, राहणार गुंधा, ता. जि. बीड हे दिनांक २१/१२/२०२४ रोजी राहते घरी गुंधा ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले तर अर्जदार क्र. ४ ही मुलगी आहे. अर्जदार क. ५ मयताची आई आहे. मयताचे आईवडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे अनंत रामभाऊ शिंदे, यांचे निधन झालेले आहे मयताचे नंत्तर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदर अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलाच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्याना सदर **मयत अनंत रामभाऊ शिंदे** यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख ११/०६/२०२५ आहे. आज दिनांक २५/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(मार्फत– श्री. धांडे महादेव विधीज्ञ)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

## जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती टी ए आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज ५४५/२०२५**

**शामल वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार : (१) शामल देविदास धुताडमल, वय ४३ वर्ष, धंदा घरकाम रा. काळा हनुमान ठाणा. चांदणे वस्ती, बीड ता. जि. बीड (२) किशोर तुकाराम चांदणे, वय ३४ वर्ष, धंदा मंजूरी रा. वरील प्रमाणे

विरुद्ध

मागणी अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत शांताबाई भ्र. नामदेव चांदणे यांचा मृत्यू दिनांक २४/०४/२००८ रोजी सरकारी दवाखान ता.जि. बीड येथे झालो आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची चुलत बहिण असून अर्जदार क्र. २ हा चुलत भाऊ आहे. मयत ही मृत्युसमयी अविवाहित होती मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत शांताबाई भ्र. नामदेव चांदणे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६ माहे मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.०३ मे २०२५

**(मार्फत– अँड. पी. बी. वैरागळ)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

## पान १ वरून पुढे...

### भर रस्त्यावर...

नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाने ही आग आटोक्यात आणली. परळी शहरात असलेल्या इटके कॉर्नर वर बीडकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला एक एमएच २४/७८९६ या क्रमांकाचा ट्रक उभा होता. दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास अचानक या ट्रकमधूनआगीचे लोळ बाहेर येताना दिसले. बघता बघता या ट्रक वरून आगीचे लोळ उठल्याचे दिसून आले. संपूर्णत: पेटलेला ट्रक नागरिकांना दिसला. तातडीने नागरिकांनी परळी नगरपरिषदेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला फोन केला. लगेचच नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाच्या दोन गाड्या त्याचबरोबर औष्णिक विद्युत केंद्राची एक अग्निशमन गाडी घटनास्थळी दाखल झाली. हा थरारक पेटलेला ट्रक व आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर केले. सर्व बाजूंनी संपूर्णतः ट्रक पेटला होता. त्यामुळे आगीचे व धुराचे लोट संपूर्णतः आकाशाला भिडल्याचे दिसून येत होते.

### कर्जाचा डोंगराला...

घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवलं. तसेच माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे. या घटनेनंतर परिसरातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

### लोकाभिमूख व...

कायम स्वरुपी ठेवावी. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणेत कार्यालयाचा कायापालट, शौचालय, पिण्याचे पाणी, कार्यालयीन स्वच्छता, कर्मचा-यांच्या टेबलवर नेम प्लेट, थम मशीन या सुधारणेला गतिमानता मिळावी. नागरिकांसोबत व्यवहार करतांना संवेदनशिलपणे करावा.

कार्यालय प्रमुखास काही अडचणी असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधवा, प्रंलबित विषयी लवकरात लवकर सोडवावे यासंदर्भात अडचणी असेल तर टिपणी टाकावी किंवा ते काम का प्रलंबित आहे ते

## पान १ वरून पुढे...

मुद्दे माझ्या निदर्शनास आणून द्यावेत. आपणास निधीची कमतरता असेल तर डिपीसीतून निधीची मागणी करावी, निधीची उपलब्धता करून दिली जाईल. १०० दिवसाची कार्यालयीन मोहिम दुस-या टप्यातील कामाची पीपीटी २ मे २०२५ पर्यंत कार्यालय प्रमुखाने सादर करावी अशी सूचना त्यांनी यावेळी केली. आपल्या काही नाविन्यपूर्ण कल्पना असतील तर त्याही मांडाव्यात त्याचा जरुर विचार केला जाईल, जेणे करुन कार्यालये आणि सोबतच जिल्हयातील स्वच्छतेचाही प्रश्न सुटेल असे ते म्हणाले

### कॅबिनेटमंत्री राधाकृष्ण...

राधाकृष्ण विखे पाटील हे राज्यातील वजनदार नेते असून कबिनेट मंत्री देखील आहेत. त्यामुळे, पोलीस स्टेशनने त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करून न घेतल्यामुळे तक्रारदार बाळासाहेब केरुनाथ विखे यांनी राहता येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांचे न्यायालयात त्या अनुषंगाने फिर्याद दाखल केली. येथील न्यायालयाने फिर्यादीची चौकशी करून सर्व संचालकांच्या विरुद्ध क्रिमिनल प्रोसिजर कोड कलम १५६ /३ अन्वये गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले होते. मात्र, सदरच्या आदेशाविरुद्ध विखे सहकारी साखर कारखानाच्या संचालकांनी उच्च न्यायालय खंडपीठात औरंगाबाद येथे दाद मागितली. याठिकाणी उच्च न्यायालयाने राहता येथील न्यायालयाचा आदेश अमान्य केला होता. त्यानंतर, बाळासाहेब विखे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. अखेर, सर्वोच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निकाल ग्राह्य धरत विखे पाटील यांच्यसह ५४ जणांवर गुन्हा दाखल करुन चौकशीचे आदेश दिले आहेत.

### अंबानगरीत श्री...

हभप.आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ७ ते१०या वेळेत पारायण सोहळा पार पडणार आहे.पारायण सोहळा कार्यक्रमा दरम्यान पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती सकाळी श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण,सांप्रदायी भजण,भक्ती

## पान १ वरून पुढे...

संगीत,कु. दिपाली रघुनाथराव कुलकर्णी परतुर, प्रसाद महाराज कुलकर्णी जवळबनकर यांचे किर्तन होणार आहे.९ मे रोजी गण गण गणात बोतेच्या गजरात टाळमृंदगाचा टेकाधरत धाकटे देवघर,कुत्तर विहर, पाटील चौक, जयवंती पुल, साई गणेश मंदीर, खोलेश्वर मंदीर, चौभारा गल्ली, गौंड गल्ली मार्गे धाकटे देवघर येथे पालखी पोहचणार आहे.१० मे रोजी शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर महाआरती व महाप्रसाद,सायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ संचलित, 'सत्संग श्री गजाननाचा' व श्रींची दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता उत्सहात करण्यत येणार आहे.पारायण सोहळा, विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादाचा अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहान संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### बीडमध्ये मोबाईल...

पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे गु.र.नं.२१०/२०२५ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हयाची दि.१२ एप्रिल २०२५ रोजी नोंद करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा उकल करण्याचे दृष्टीकोणातुन मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिले. त्यावरुन पो.नि. स्था.गुशा.बीड यांनी आपले अधिपत्याखालील पोउपनि सुशांत सुतळे व त्यांचे पथकाला गुन्हयाचे उघडकीस आणण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. पोउपनि सुशांत सुतळे यांनी त्यांची गोपनिय यंत्रणा सतर्क करुन दिनांक २८/०४/२०२५ रोजी स्थागुशा पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, दोन इसम हे बीड शहरातुन वेगवेगळया ठिकाणाहुन मोबाईल हिसकावुन चोरुन नेलेले मोबाईल विकणेकामी समर्थ मंगल कार्यालय समोर ते अहिल्यानगर जाणार्या रोडवर येणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली तेव्हा सदर माहिती पो.नि. स्था.गु.शा. यांना देवुन त्यांनी तत्काळ पुढील कारवाई करणेचे आदेश दिल्याने स्थागुशा पथक बातमी ठिकाणी जावुन तेथे सापळा लावला असता एक मोटार सायकलवर दोन

## पान १ वरून पुढे...

इसम आल्याचे दिसुन आले तेव्हा त्यांचेकडे जात असतांना त्यांनी तेथुन मो.सा.वर पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यांना पथकाने पकडुन त्यांची नावे विचारली असता १) आदित्य बंकट नरवडे वय १९ वर्षे रा.बालेपीर ता.जि.बीड, २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे वय १९ वर्षे रा.ईट ता.जि.बीड असे सांगितले. मोबाईल हिसकावुन चोरी केलेल्या घटनांबाबत बारकाईने विचारपुस केली असता आदित्य नवडे व त्यांचे इतर दोन साथीदार यांनी मिळुन मो.सा.वर जावुन मो.सा.वर जावुन मोबाईल बोलत चालत असलेल्या लोकांचे मोबाईल हिसकावुन चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण १० रिअल मी, सॅमसंग अल्ट्रा, रिअल मी, विवो, ओपो, पो.को. कंपनीचे मोबाईल व गुन्हयात वापरलेली स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण २,८७,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपींकडुन खालील नमुद उकल करण्यात स्था.गु.शा.पथकाला यश आले आहे.

१) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं २१०/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. २) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं १६५/२०२५ कलम ३०४(४) भा.न्या.सं. ३) पो.स्टे.बीड शहर गुरनं ४०/२०२५ कलम ३०३(२), भा.न्या.सं. ४) पो.स्टे.बीड शहर गुरनं ६७/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं. सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी निष्पन्न करण्यात आलेले असुन १) आदित्य बंकट नरवडे रा.बालेपीर व २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे यांना पो.स्टे.शिवाजीनगर,बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. त्यांचेकडुन मोबाईल चोरीचे आणखीन इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्तता आहे. उर्वरित एक आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे.

सदरची कामगिरी . नवनित काँवत पोलीस अधीक्षक बीड, . सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे पोह/मारुती कांबळे, पोह/विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, देविदास जमदाडे, पोशि/ नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, चापोह/नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com